# उल्हासनगर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

**दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६,** विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : २६/०६/२०२४

**विषय: शहरातील अनधिकृत ऑर्केस्ट्रा बारवर कारवाई**

**प्रसिध्दी पत्रक**

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी सुरु असणा-या ऑर्केस्ट्रा बारचे बेकायदेशिर बांधकामावर कारवाई करणेसाठी मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ४, उल्हासनगर यांनी मा.प्रशासक तथा आयुक्त यांना लेखी पत्रान्वये कळविले होते. त्या अनुषंगाने महापालिका क्षेत्रात खाली नमुद केलेल्या ऑर्केस्ट्रा बारच्या बेकायदेशिर बांधकामावर आज दिनांक २६/६/२०२४ रोजी सहायक आयुक्त, प्रभाग समिती व पोलीस विभागाने संयुक्त कारवाई करुन बारमधील बेकायदेशिर बांधकाम निष्कासीत केलेले आहे.

१. ॲप्पल बार, श्रीराम चौक, उल्हासनगर-४
२. एंजल बार, श्रीराम चौक, उल्हासनगर-४

शहरातील इतर बारमालकांना देखिल नोटीस बजावण्यात आलेली आहे. सदर बारमालकांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी सुरु असून पडताळणीअंती जे बार बेकायदेशिर आढळून येतील त्यांचेविरुध्द निष्कासनाची कारवाई करणेसाठी मा.प्रशासक तथा आयुक्त श्री.अझीझ शेख यांनी सर्व सहायक आयुक्त यांना आदेश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने सर्व सहायक आयुक्तांमार्फत कारवाई सुरु करण्यात आलेली आहे.

(छाया प्रकाश ढंगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.